ePaper


## “23 नोव्हेंबरला राज्यात बॉम्ब फुटणार”, मुख्यमंत्री शिंदेंचा इशारा



|| वर्ष - 8 | अंक -115 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत

- तुम्ही फलंदाजांना दोष देऊ नका!
- ‘भारतासाठी ‘ती’ गोष्ट शत्रू ठरतेय...’
- श्रीनगरच्या मार्केटमध्ये ग्रेनेड हल्ला
- सत्ताबदल करण्याशिवाय पर्याय नाही


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 4 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## दिवाळीनिमित्त आतिषबाजीने प्रदूषण

# पुण्याची हवा धोकादायक पातळीवर!

### बिघडलेल्या हवेचे परिणाम काय? : नागरिकांना श्वसनासह आरोग्याच्या समस्या

| पुणे | महाईन्यूज

**दिवाळीनिमित्त झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने शहर आणि उपनगरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. काही भागातील हवा तर धोकादायक पातळीवर पोहोचली असून, धोकादायक स्तरातील हवेमुळे श्वसनास त्रास होण्यासह आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात.**



धुलिकणांचे हवेतील प्रमाण वाढल्यावर हवेची गुणवत्ता बिघडते. फटाके, बांधकामे अशा विविध कारणांनी हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. शुक्रवारी लक्ष्मीपूजनानंतर शहर आणि उपनगरांमध्ये झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेची गुणवत्ता बिघडली आहे. शुक्रवारी रात्रीच हवा गुणवत्ता निर्देशांक ११५च्या पुढे गेला होता. हवेच्या गुणवत्ता निकषानुसार ५० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेची गुणवत्ता निर्धोक मानली जाते. समाधानकारक स्तरात ५१ ते १०० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेतील काही प्रदूषणकारी घटक त्रासदायक ठरू शकतात.

साधारण स्तरात १०१ ते २०० दरम्यान निर्देशांक असल्यास मुले आणि ज्येष्ठांना श्वसनासाठी त्रास होतो. वाईट स्तरात २०१ ते ३०० या दरम्यान निर्देशांक असल्यास सर्वांवरच त्याचा विपरीत परिणाम होतो. अतिवाईट स्तरात ३०० पेक्षा जास्त निर्देशांक असल्यास आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.

### शिवाजीनगर येथे सर्वाधिक प्रदूषण...

लक्ष्मीपूजन झाल्यानंतर उडवलेल्या फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला होता. या धूरकट वातावरणाचा परिणाम शनिवारीही दिसून आला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार हवा गुणवत्ता निर्देशांक शिवाजीनगर येथे २५४, भूमकरनगर येथे १७४, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे २९८, कर्वे रस्ता येथे २०९, हडपसर येथे २८१, लोहगाव येथील म्हाडा कॉलनी येथे १५४, पंचवटी येथे १९६ नोंदवला गेला.

## पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा

### विधानसभा रणसंग्राम: केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी |



महाराष्ट्रात विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. सर्व पक्ष चुरशीची लढत देण्यासाठी सज्ज आहेत. राज्यात वरिष्ठ नेत्यांच्या सभांचे आयोजनही करण्यात आले आहे. तसेच पक्षप्रमुखांचे जिल्हा दौरेही सुरु झाले आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीमहायुतीच्या प्रचारासाठी महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा बरोबरच त्यांची पुण्यातही सभा होणार असल्याची माहिती खासदार मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना दिली आहे. मोहोळ म्हणाले, महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक होणार आहे. पतंप्रधान नरेंद्र मोदी आमच्या पक्षाचे सर्वोच्च नेते आहेत. पुण्यात त्यांची १२ नोव्हेंबरला सभा होणार आहे. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा प्रत्येक ठिकाणी २, २ सभा होतील असा आता तरी अंदाज आहे.

नाराज नेत्यांचा समजूत काढण्याचा प्रयत्न होतोय, त्याबाबत हे नेते ऐकतील का? असे विचारले असता मोहोळ म्हणाले, आम्ही भाजप संघटना शेवटी एक परिवार म्हणून काम करतो. त्यात जो नाराज आहे. ज्याला संधी नाही मिळाली. अशा कार्यकर्त्यांना आमच्या पक्षाचे नेते घरी जाऊन भेटतात. एका परिवाराप्रमाणे त्याला वागणूक दिली जाते. म्हणून आमची जगातील सर्वोत्तम संघटना आहे. आमच्या छोट्या कार्यकर्त्यांपासून सगळ्यांच्या भेटी घेतल्या आहेत. आमची ती संस्कृती आहे.

### महायुतीमुळे महाराष्ट्र सुरळीत...

आमच्या राज्यातले तिन्ही नेते एकनाथ शिंदे. देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी अडीच वर्षे महाराष्ट्राची सेवा केली. त्यांनी नेत्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. नाराज नेत्यांना फडणवीस यांनी फोनही केले. त्यामुळे महायुतीत कुठंही बेबनाव झालं असं चित्र तुम्हाला पुढील काही दिवसात दिसणार नाही. स्वाभाविक आहे की, नेत्याला संधी नाही मिळाली कि नाराजी येते. पण आम्हाला विश्वास आहे की, या तीन नेत्यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रात सर्व सुरळीत होईल.

## पुण्यात गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान

# ऐन दिवाळीत वाहनांची तोडफोड!

### औंधमधील घटना : चतु:श्रृंगी पोलिसांत आठ जणांवर गुन्हा


। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ऐन दिवाळीत टोळक्याने दहशत माजवून वाहनांची तोडफोड केल्याची घटना औंधमधील महापालिका वसाहतीत घडली. टोळक्याने महिलेसह एका तरुणावर शस्त्राने वार केल्याची घटना घडली. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी आठजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तोडफोडीत दहा दुचाकी आणि तीन रिक्षांचे नुकसान झाले. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.**



याप्रकरणी ओंकार नरवडे (वय २०, रा. डॉ. आंबेडकर वसाहत, औंध), पियूष (वय २१), नंदन (दोघे रा. पीएमसी वसाहत, औंध), आर्यन मोरे (वय २०, रा. डॉ. आंबेडकर वसाहत, औंध) यांच्यासह आठजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत साहिल संजय पवार (वय २०, रा. डॉ. आंबेडकर वसाहत, औंध) याने चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींचा तक्रारदार साहिल याच्याशी किरकोळ कारणावरुन वाद झाला होता. आरोपी महापालिका वसाहतीत आले. त्यांनी साहिल आणि त्याची आई दीपाली यांना शिवीगाळ केली. दीपाली यांना मारहाण करुन त्यांच्यावर वार केले. त्यावेळी भांडणात मध्यस्थी करणाऱ्या सनी सोनवणे याच्यावर आरोपींनी वार केले. महापालिका वसाहतीच्या आवराता लावलेल्या आठ ते दहा दुचाकींची तोडफोड केली, तसेच तीन रिक्षांच्या काचा फोडून दहशत माजविली. दहशत माजवून आरोपी पसार झाले. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.

#### पर्वती परिसरात कोयत्याने वार...



पर्वती परिसरात तरुणावर शस्त्राने वार पर्वती भागातील लक्ष्मीनगर परिसरात शनिवारी सकाळी टोळक्याने वैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार केल्याची घटना घडली. सूरज उर्फ बाल्या नितीन क्षीरसागर (वय २१, रा. शाहू वसाहत, लक्ष्मीनगर, पर्वती) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी शुभम गेजगे, आदित्य गेजगे, पल्या पासंगे (तिघे रा. डॉ. आंबेडकर वसाहत, लक्ष्मीनगर, पर्वती) यांच्यासह आठजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सूरज हा शाहू वसाहत परिसरात शनिवारी सकाळी थांबला होता. त्यावेळी आरोपींनी त्याच्यावर कोयत्याने वार केले. मध्यस्थी करणाऱ्या नागरिकांना धमकावून आरोपींनी कोयते उगारुन दहशत माजविली. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात सूरज गंभीर जखमी झाला आहे. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक शिंदे तपास करत आहेत.

---

## आमदार बनसोडे यांच्याकडे विकासकामांची हातोटी!

### रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष शरद म्हस्के : बनसोडे यांच्या विजयासाठी ताकदीने काम करणार!

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार अण्णा बनसोडे यांची काम करण्याची हातोटी चांगली आहे. त्यांच्याकडून पुढील काळात देखील चांगले काम केले जाईल. त्यामुळे आम्ही अण्णा बनसोडे यांच्या विजयासाठी प्रयत्नशील असणार आहोत. पिंपरी विधानसभा मतदारसंघात अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग हा समाज जास्त आहे. त्यामुळे स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची महायुतीला चांगली मदत होईल, असा विश्वास स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष शरद म्हस्के यांनी व्यक्त केला.**



स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाने महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंबा दिला. याबाबतचे पत्र पक्षाच्यावतीने अण्णा बनसोडे यांना देण्यात आले आहे. त्यानंतर स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षातील कार्यकर्त्यांनी बनसोडे यांच्या प्रचारात सक्रिय भूमिका घेतली आहे.

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष शरद म्हस्के यांनी आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंब्याचे पत्र दिले. यावेळी शहर उपाध्यक्ष गणेश भोसले, गणेश फरांदे, ऋषिकेश म्हस्के, किरण पन्हाळे, महेश जाधव, आरपीआय (आठवले) पक्षाचे शहराध्यक्ष कुणाल ओव्हाळकर, माजी अध्यक्ष सुरेश निकाळजे आदी उपस्थित होते. स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष शरद म्हस्के म्हणाले, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश साळवे यांनी महायुतीच्या नेत्यांशी चर्चा केली. त्यानुसार स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष महायुतीमध्ये सहभागी झाला आहे. पक्षातील वरिष्ठांनी महायुतीच्या उमेदवारांचे काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड शहरात महायुतीच्या उमेदवारांचे काम केले जाणार आहे. स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचा आगामी निवडणुकांमध्ये योग्य सन्मान केला जाईल, असे आश्वासन आमदार अण्णा बनसोडे यांनी यावेळी दिले.

#### खासदार बारणेंचे साथ, अन् अपक्षांचा पाठिंबा...

दरम्यान, आमदार आण्णा बनसोडे यांनी महायुतीचे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या निवासस्थानी भेट घेवून शुभेच्छा देत त्यांच्या परिवारासोबत संवाद साधला. एकजुटीने लढू, पक्ष आणि युती मजबूत ठेऊ, विजयी पताका फडकवू, असा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली महायुतीचा किल्ला भक्कम करण्यासाठी आणि पक्ष व युतीचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी विधानसभेसाठी इच्छुक असणाऱ्या अपक्ष उमेदवार रिताताई सोनवणे यांनी आपला अर्ज मागे घेवून आमदार बनसोडे यांना बिनशर्त पाठिंबा दिला.

## महाविकास आघाडीचा निर्धार

# विधानसभा निवडणूक एकजुटीने लढणार!

### खासदार डॉ. कोल्हे, शिवसेना संपर्क प्रमुख अहिर यांची तयारी!

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आगामी विधानसभा निवडणूकीला गट-तट, नाराजी विसरून महाविकास आघाडी एकदिलाने सामोरे जाऊन तीनही जागांवर विजयश्री खेचून आणण्याचा निर्धार केल्याची माहिती पत्रकार परिषदेत शिवसेनेचे संपर्क प्रमुख सचिन अहिर व खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह घटक पक्षातील नेत्यांनी केला.**



पिंपरी-चिंचवड शहरात शिवसेनेला उद्धव ठाकरे पक्षाला एकही जागा न मिळाल्याने शिवसेना कार्यकर्त्यांत नाराजी होती. त्या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व काँग्रेस या घटक पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवारी (ता. ३) पिंपरीत संयुक्त बैठक घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. या बैठकीनंतर तीनही पक्षातील नेत्यांनी संयुक्तिक पत्रकार परिषद घेऊन माध्यमाशी संवाद साधत याबाबत माहिती दिली.

यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते सचिन अहिर, आमदार गौतम चाबुकस्वार, सुलभाताई उबाळे, माजी महापौर संजोग वाघेरे, सुनील गव्हाणे, तुषार कामठे, रवी लांडगे, केसरीनाथ पाटील, तुषार साने, महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चिंचवडचे उमेदवार राहूल कलाटे, भोसरीचे उमेदवार अजित गव्हाणे, पिंपरीच्या उमेदवार सुलक्षणा शिलावंत, माजी नेताजी काशिद, दत्तात्रय वाघेरे, कल्पना शेटे यांच्या सह शिवसैनिक व घटक पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते.

> पिंपरी-चिंचवड शहरात पक्षाची ताकत असूनही एकाही जागेवर उमेदवारी न मिळाल्याने शिवसेना कार्यकर्त्यांत नाराजी होती. त्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत महाविकास आघाडीच्या घटक पक्षांतील पदाधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत नाराजी दूर झाली असून आता आम्ही एकदिलाने विधानसभा निवडणूकीला सामोरे जाणार आहोत.
> **– सचिन अहिर,** उपनेते शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष.

> मी मनापासून शिवसेननेचे आणि विशेषत: सचिन अहिर साहेबांचे आभार मानायला तेवढे कमी आहेत. त्यांनी सर्व शिवसैनिकांनी आघाडीचा धर्म पाळावा म्हणून विशेष प्रयत्न केले. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व पक्ष एकजुटीने आणि एकदिलाने काम करून पिंपरी-चिंचवड शहरातील तीनही जागा बहूमताने जिंकातील हे नक्की आहे.
> **– डॉ. अमोल कोल्हे,** खासदार राष्ट्रवादी काँग्रेस, शरदचंद्र पवार पक्ष.

---

## आमदार लांडगेंच्या विजयासाठी महायुतीची "वज्रमूठ'

### मोशी निवडणूक कचेरीचे उद्घाटन : ज्येष्ठांनी केला विजयाचा संकल्प

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांची निवडणूक कचेरी मोशीत सुरू करण्यात आली आहे. मोशीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेजवळील या कचेरीचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मोशीचे ग्रामदैवत नागेश्वर महाराजांच्या जयघोषात कचेरीचे कामकाज सुरू झाले.**

माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा कविता आल्हाट, माजी नगरसेविका सारिका बो-हाडे, माजी उपमहापौर शरद बो-हाडे, निखिल बो-हाडे, निलेश बोराटे, वंदना आल्हाट, सागर हिंगणे, राजेश सस्ते, गणेश सस्ते, मंगेश हिंगणे, काळूराम सस्ते, नामदेव सस्ते, रवि गायकवाड, प्रवीण बनकर, मनिषा सस्ते, राष्ट्रवादीचे विजय सस्ते, मधुकर बोराटे, संजय हजारे यांच्यासह मोशी परिसरातील नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. मोठ्या उत्साहात कचेरीचे उद्घाटन करण्यात आले.




मागील १० वर्षांत केलेल्या विकास कामाच्या जोरावर आमदार महेश लांडगे तिसऱ्यांदा निवडणुकीला सामोरे जात आहेत. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने आमदार लांडगे यांच्या माध्यमातून समाविष्ट गावातील विकास कामांना चालना मिळाली. समाविष्ट गावातील नितीन काळजे, राहुल जाधव यांना महापौरदाच्या माध्यमातून शहराचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. २०१७ पासून समाविष्ट भागाचा झपाट्याने विकास झाला. सर्व सोयी-सुविधा नागरिकांना उपलब्ध झाल्या. त्यामुळे समाविष्ट भागातील नागरिक आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. आमदार लांडगे यांच्या प्रचार फेरी, कोपरा सभांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

> समाविष्ट गावांचा विकास हाच माझा राजकीय अजेंडा राहीला आहे. २०१७ मध्ये महानगरपालिका भाजपा सत्ता काळात समाविष्ट गावांच्या विकासाला चालना मिळाली. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला. बोऱ्हाडेवाडी येथे रहिवाशी क्षेत्र वगळून टीपी स्कीम राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. त्यामुळे सर्वसमावेशक विकासाचे ध्येय दृष्टीक्षेपात आले आहे.
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी, विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.



## भूमिका

**मी महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाममंत्री असतानाची घटना. मुंबईतील माझ्या १८ वर्षांच्या काळात रतन टाटा यांच्याशी माझी नियमित भेट होत असे. ते माझ्या घरी येत. मीही त्यांच्या घरी जात असे. एकदा मलबार हिल्स भागातील माझ्या निवासस्थानी यायला रतनजी निघाले. पण, रस्ता विसरले.**

# सामाजिक जाणीव राखणारा उद्योगपती

मी त्यांची वाट बघत होतो. मग त्यांनी मला फोन केला आणि म्हणाले, "नितीन, मी तुमच्या घराचा रस्ता विसरलोय.." मी म्हणालो- "हरकत नाही. ड्रायव्हरला फोन द्या, मी त्याला समजावून सांगतो." त्यावरचे त्यांचे उत्तर धक्कादायक होते. "ड्रायव्हर नाहीये सोबत. मी स्वत: चालवतोय गाडी.." असे रतनजी म्हणाले तेव्हा मला फार आश्चर्य वाटले. एवढा मोठा अब्जाधीश-उद्योगपती, पण ड्रायव्हर नाही, सुरक्षा व्यवस्था नाही!.. पण, जसजसा रतनजींशी संबंध वाढला, तसतसे हे माझ्या लक्षात आले की, ते असेच आहेत. रतनजी एक उत्तम 'ह्युमन बीईंग' होते. ते साधे, सरळ, निगर्वी आणि शालीन होते. आमचा स्नेह तब्बल तीन दशकांचा. रतनजी माझ्यापेक्षा वयाने मोठे होते, पण आमची मैत्री जुळली होती. ते मुंबईत भेटत, दिल्लीत घरी येत आणि नागपूरलाही यायचे. मी त्यांच्यासोबत प्रवासही केला आहे.मला आठवतो एक प्रसंग. संभाजीनगरला डॉ. हेडगेवार हॉस्पिटलची उभारणी झाली. संघाचे



ज्येष्ठ प्रचारक मुकुंदराव पणशीकर मला म्हणाले की, नितीन या हॉस्पिटलचं उद्घाटन रतनजींच्याच हस्ते व्हायला हवं आणि त्यांना आणण्याची जबाबदारी तुझी! मग मी आणि हॉस्पिटलचे एक संचालक असे दोघे जण टाटा सन्सच्या कार्यालयात गेलो. रतनजींना भेटलो. त्यांना विनंती केली तर ते हसले आणि म्हणाले- "नितीन मी स्वत:च्या फॅक्टरीचंही उद्घाटन कधी केलं नाही.." मी त्यांना पुन्हा विनंती केली आणि म्हणालो- "मला तुमच्या कामाच्या पद्धतीची कल्पना आहे पण तुम्ही माझे मित्र आहात ना?.. मग तुम्हाला यावंच लागेल." कोणतीच खळखळ न करता त्यांनी आमचे आमंत्रण स्वीकारले आणि स्वत:च्या खासगी स्पेशल फ्लाइटने ते संभाजीनगरला आले. मी सोबत होतो. त्या प्रवासात त्यांनी सहज मला विचारले की, हे संघाचे हॉस्पिटल आहे तर फक्त हिंदूंनाच सेवा मिळणार आहेत का?.. मी त्यांना सांगितले की, तसे काहीही नाही. संघ असा भेदभाव करीत नाही. या हॉस्पिटलच्या सेवा सर्व जाती-धर्माच्या लोकांना मिळतील. त्यांचे समाधान झाले. ते म्हणाले की, सेवाकार्ये अशीच असायला हवीत. हीच खरी ईश्वरसेवा आहे, देशसेवा आहे. त्यांचा स्वभाव अतिशय वेगळा होता. स्वत:ची बॅग स्वत: उचलणार, ड्रायव्हरशेजारच्या यजमानाच्या जागेवर बसणार नाहीत, हा त्यांचा शिरस्ता होता.मी महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम खात्याचा मंत्री असताना मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, मुंबईतील सी लिंक प्रकल्प, उड्डाणपूल इत्यादी अनेक कामे झाली. त्याबद्दल ते जाहीरपणे बोलत, माझी प्रशंसा करीत. व्यक्तिगत भेट झाल्यावर आवर्जून शाबासकी देत. रतनजी आणि तत्कालीन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी मला कौतुकाची पत्रे लिहिली होती. ती माझ्यासाठी मर्मबंधातली ठेव आहे. त्या काळात अशा विकास कामांसाठी आम्ही एमएसआरडीसीतर्फे बॉंड इश्यू केले होते. १९९६ मध्ये आम्हाला ५०० कोटी हवे होते, मिळाले ११५० कोटी. नंतर आणखी ६०० कोटी रुपयांसाठी मार्केटमध्ये गेलो तर १२०० कोटी रुपये मिळाले. आमचे बॉंड्स ओव्हरसब्सक्राइब झाले. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एवढा पैसा बाजारातून उभा करता येतो, यावर विश्वास बसणे कठीण होते. रतनजी एका भेटीत मला म्हणाले, "यू आर मोअर प्रोफेशनल दॅन मी. आय डिडन्ट एक्सपेक्ट धिस मच रिस्पॉन्स टू इन्फ्रा प्रोजेक्ट्स.." मी त्यांना धन्यवाद दिले. त्यांनी मला शुभेच्छा दिल्या. एखादा माणूस डाऊन टू अर्थ किंवा फार साधा आहे, असे आपण म्हणत असतो. पण तसे असणे म्हणजे काय, हे मी अनुभवले आहे आणि त्या आयुष्यभराच्या अनुभवाचे नाव आहे- रतनजी टाटा! एका उड्डाणपुलाच्या उद्घाटनाला मी त्यांना हेलिकॉप्टरने वाशीला नेले होते. ते स्वत: हेलिकॉप्टर चालवीत, विमान उडवीत. त्यात सहजता होती. कोणताही आविर्भाव नव्हता. जे काही करायचे ते निरपेक्ष, नि:स्पृह आणि नि:स्वार्थी भावनेने हा त्यांचा स्वभाव होता. एकदा त्यांच्या कुलाब्यातल्या घरी गेलो, तेव्हा दोन-तीन सेवक आणि काही श्वान यापलीकडे फारसे काही दिसले नाही.

**-नितीन गडकरी**

## प्रासंगिक »

### 'तारे'तोडण्याचे तर्कट!

***परग्रहांवरील जीवसृष्टी स्पष्टपणे नाकारणे अवघड असे अनेक शास्त्रज्ञ म्हणतात... पण 'इस्रो'चे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी तसे म्हटल्याने चर्चा वाढली...***

विज्ञानकथाकार आर्थर सी. क्लार्क यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे : 'एक तर आपण (म्हणजे मानव जात) विश्वात एकटे आहोत किंवा नाही. दोन्ही शक्यता तितक्याच घाबरविणाऱ्या आहेत.' एकटेपणाच्या याच भीतीतून पृथ्वीसारख्याच अन्य एखाद्या किंवा अनेक ग्रहांवर जीवसृष्टी असू शकते का, हा प्रश्न जसा कथाकारांना गेली अनेक वर्षे पडत आला आहे. तसा तो वैज्ञानिकांच्या कुतूहलाचाही विषय आहेच. कथा-कादंबरीकाराला कल्पनेचे अनेक झोके घेता येत असल्याने, तो सहजपणे या झोक्यांवर हिंदोळे घेत या परजीवसृष्टीच्या कल्पनांच्या भराऱ्या मारू शकतो. वैज्ञानिकांना विज्ञानकथेमध्ये ही मुभा थोडीफार असते. पण एखाद्या वैज्ञानिकाने तसा ठाम दावा करणे आणि 'त्याचे प्रत्यक्ष पुरावे नसले, तरी माझी सचेतन जाणीव यावर विश्वास ठेवते,' असे म्हणणे धाडसाचे व पर्यायाने चर्चेचे ठरते.

तुमच्यासंग वस्तू बोलतात का? माह्यासंगं तं बोलतात बॉ! अन् मले तं पक्कं मैत हाये का वस्तू येकोन्मेकीसंग बी बोलत असतीन.काय बोलत अस्तीन बरं त्या? मान्सानंच बनोलं म्हनून मान्साच्याच हिताचा इच्यार करत अस्तीन,नाई का? हौ,निदान निर्जीव वस्तू तं नक्कीच मान्साच्या हिताचा इच्यार करत असतीन!

# आपले बी अच्छे दिन येतील !

आसपास फटाक्याईचा कानठया बस्तीन असा आवाज सुरू होता. पन घरापूळे लावेल दिवे शांत होते. तशे बी ते शांतच असतात म्हना. पन अंधाऱ्या आंगनात उजीळ द्याचं त्याईच्यावर महत्त्वाचं काम असते.आज दिवाई असल्याच्यानं लायटिंगा, मेनाचे दिवे, चिरांगनं झयझय झयकून रायले होते. न् त्या चिरांगनातल्या दिव्याईले काम होतं फटाके, फुलझळ्या,झाळं,चक्र्या,सुतई याटमबॉम चेतवाचं. मस्तं कळक ऊन देयेल फटाके टनाटन् वाजत होते. औंदा तीय,मुंग साजरा झाल्ता तं सोन्ट्यानं फटाके मांगतले न् बापानं आनून बी देल्ते.घर दार खुशीत होतं. फक्त दिवे जराक नाराज दिसले.दिवे येकोन्मेकाले म्हनत का 'आपुन बी जयतो न् फटाके बी जयतात. तरीबी फटाक्याईचा आनंद स-याईले जास्तीचाच असते. कारन तो दोन दिवसाचा पावना हाये म्हंतात. त्याचं कौतिक जास्तच! उलट आपल्याले जास्तीचं तेल लागीन म्हनून मालकीन उलीउलीच तेल



टाकते. दिवे भारीतले पन त्यात तेल पायलं तं उलसंकच! बाकीचे दिवे म्हनत 'बरोबर हाये...फटाके पावने हायेत तं आमीबी पावनेच हावो ना! आमच्याच नावाचा सन न् आमालेच तेल नाई...वा रेवा!!''बरं लोकाईचा हा चिम्मुकपना दिव्याच्या तेलाच्याच वक्ती निंगते काय? खायाले पायजे तेला-तुपाचं,कपळे लत्ते हजाराचे,ऑनलाईन शॉपींगा लाखाच्या, फटाके बी दाहाक हजार खातच अस्तीन. मंग आमीच डोयात सलतो काय लेक??' -कोनाड्यातला दिवा म्हने.अदिक येक दिवा म्हने- फटाक्याईचा मौसम असते तसा आपला असते काय? आपली गरज लोकाईले सद्दाईच असते. त्यामानानं फटाके वर्सातून येक खेप येतात. दुसरा दिवा म्हने 'हौ न् मारे कचरा,धुपट,केमिकलचं हवेत प्रदुषण करतात.वर अपघात होतात ते अल्लगच... ते दिसत नाई काय?'लायटिंग नं तं इलेक्ट्रिक डिपार्टमेंटलेच धुतलं. ते दिव्याईले म्हने- 'आमाले तं नाई जऊन रायले ना तुमी? दिवसभर लाईन नसते ताहा कुठी राती हा झगमगाट दिसते. शेतकऱ्यांईच्या पीकासाटी पानी द्याले पोट दुखनारा हा विभाग लायटिंगा लावाले फुकट इलेक्ट्रिक देत अशिन काय? तेंदरोजी मालकीननं बोर्डात जाऊन बेज्जा भांडन केल्तं. तीन तीन कंपन्या तयार केल्या तरी लोडशेडींग नाईतं ऐन कामाच्या वक्ती लाईन दवडाची सवय काई जातच नाई बिचा-याईची. पन बील पूरं येते आँ. रूपयाई कमी नसते.!' ते सरं भंगारात पळेल चीमन्या,कंदिलं आईकून मनातच म्हनत का 'सा-याईचेच दिवस असतात मावले. तुई थांब नवी डिझाईन बजारात आली का तू बी येतच आमच्यात.तशीबी तू चायनीजच..

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 23 नोव्हेंबरला राज्यात बॉम्ब फुटणार!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा महाविकास आघाडीला इशारा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुर्ला विधानसभा मतदारसंघात सभा घेत प्रचाराचा नारळ फोडला आहे. शिंदे कुर्ला येथील सभेत बोलताना म्हणाले, मंगेश कुडाळकर हे ओपनिंग बॅट्समन झालेले आहेत. आता तुम्हाला या मॅचमध्ये चौकार-षटकार मारायचे आहेत. तर बाकी लोकांना क्लीन बोल्ड आणि डिपोझिट गुल करायचे आहे. दिवाळी आहे. फटाके फुटत आहेत. मात्र २३ तारखेला आपला अॅटम बॉम्ब फुटणार आहे. आता पुढील काही दिवस महायुतीच्या सभा होतील. आजही महायुतीची सभा आहे.**



राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीत प्रमुख लढत होणार आहे. दरम्यान आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुर्ला विधानसभा मतदारसंघात सभा घेत प्रचाराचा नारळ फोडला आहे. एकनाथ शिंदे यांनी कुर्ला मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. दरम्यान महायुतीची देखील ही पहिलीच प्रचारसभा होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार निशाण साधला आहे. शिंदे म्हणाले, माझ्या लाडक्या बहिणींना, खास करून भाऊबीजेच्या शुभेच्छा देतो. आता तुम्हाला केवळ वर्षालाच नव्हे तर, दर महिन्याला भाऊबीज मिळणार आहे. माहेरचा आहेर दर महिन्याला तुम्हाला मिळणार आहे. आम्ही देणारे आहोत. हे विरोधी पक्षाचे नेते लाडकी बहीण योजना बंद होईल, ही योजना आम्ही बंद करू, असे म्हणतात. खोडा घालणाऱ्यांना तुम्ही जोडा दाखवणार की नाही? या योजनेच्या विरोधात ते हायकोर्टात देखील गेले. हायकोर्टाने त्यांना चांगलेच झापले. काँग्रेस आणि महाविकास आघाडीची लोक नागपूर खंडपीठात देखील ही योजना बंद करण्यासाठी गेले. आता तर यांचे सरकार आले तर या योजना बंद करू असे हे म्हणत आहेत. त्यांना वाटत असेल लाडकी बहिणीला पैसे देणारा गुन्हेगार आहे, तर असे मी असा गुन्हा १० वेळा करण्यासाठी तयार आहे. आम्ही लाडक्या बहीण योजनेचे पैसे वाढवू. राज्यात लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे. २० तारखेला मतदान आणि २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. दरम्यान महायुती आणि महविकास आघाडीने जोरदार तयारी सुरू केली आहे. प्रचारसभा सुरू झाल्या आहेत. विकासाचा मुद्दा घेऊन महायुती जनतेसमोर जात आहेत. दरम्यान राज्यात तिसरी आघाडी देखील तयार झाली आहे. तसेच लोकसभेप्रमाणे विधानसभेत देखील मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा फटका बसणार का हे पाहणे देखील महत्वाचे असणार आहे. एकनाथ शिंदे यांनी

### डिपोझिट गुल करायचे आहे

२० तारखेला मतदान आणि २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. दरम्यान महायुती आणि महविकास आघाडीने जोरदार तयारी सुरू केली आहे. प्रचारसभा सुरू झाल्या आहेत. विकासाचा मुद्दा घेऊन महायुती जनतेसमोर जात आहेत. दरम्यान राज्यात तिसरी आघाडी देखील तयार झाली आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुर्ला विधानसभा मतदारसंघात सभा घेत प्रचाराचा नारळ फोडला आहे. शिंदे कुर्ला येथील सभेत बोलताना म्हणाले, मंगेश कुडाळकर हे ओपनिंग बॅट्समन झालेले आहेत. आता तुम्हाला या मॅचमध्ये चौकार-षटकार मारायचे आहेत. तर बाकी लोकांना क्लीन बोल्ड आणि डिपोझिट गुल करायचे आहे.

कुर्ला मतदारसंघात महायुतीचे उमेदवार मंगेश कुडाळकर यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. दरम्यान महायुतीची देखील ही पहिलीच प्रचारसभा होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार निशाण साधला आहे. शिंदे म्हणाले, माझ्या लाडक्या बहिणींना, खास करून भाऊबीजेच्या शुभेच्छा देतो. आता तुम्हाला केवळ वर्षालाच नव्हे तर, दर महिन्याला भाऊबीज मिळणार आहे. माहेरचा आहेर दर महिन्याला तुम्हाला मिळणार आहे. आम्ही देणारे आहोत. हे विरोधी पक्षाचे नेते लाडकी बहीण योजना बंद होईल, ही योजना आम्ही बंद करू, असे म्हणतात. खोडा घालणाऱ्यांना तुम्ही जोडा दाखवणार की नाही? या योजनेच्या विरोधात ते हायकोर्टात देखील गेले. हायकोर्टाने त्यांना चांगलेच झापले. काँग्रेस आणि महाविकास आघाडीची लोक नागपूर खंडपीठात देखील ही योजना बंद करण्यासाठी गेले. आता तर यांचे सरकार आले तर या योजना बंद करू असे हे म्हणत आहेत. त्यांना वाटत असेल लाडकी बहिणीला पैसे देणारा गुन्हेगार आहे, तर असे मी असा गुन्हा १० वेळा करण्यासाठी तयार आहे. आम्ही लाडक्या बहीण योजनेचे पैसे वाढवू. राज्यात लवकरच विधानसभा निवडणूक होणार आहे.

# ‘निवडणुकीनंतर काहीही होऊ शकतं’


## शरद पवार आणि एकनाथ शिंदे संपर्कात : नवाब मलिक

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकारणात अनेक उलथापालथी पाहायला मिळाल्या. एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले पक्ष सत्तास्थापनेसाठी आघाडीमध्ये आले. त्यानंतर दोन पक्षांचे दोन तुकडे झालेले पाहायला मिळाले. जे कालपर्यंत विरोधी पक्षनेते होते, ते मंत्री झालेले पाहायला मिळाले. या सर्व पार्श्वभूमीनंतर आता २०२४ च्या विधानसभा निवडणुका होत आहेत.**







या निवडणुकानंतरही कोणता पक्ष कुठे असेल? हे सांगता येत नाही, अशी शक्यता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते नवाब मलिक यांनी व्यक्त केली आहे. तसेच शरद पवार आणि एकनाथ शिंदे संपर्कात आहेत, असा दावा त्यांनी केला आहे.मुंबई तक या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये नवाब मलिक यांनी अनेक दावे केले आहेत. तसेच सध्याच्या राजकारणावर खळबळजनक विधानही केली आहे. निवडणुकीनंतर भाजपाचेच सरकार येईल किंवा अजित पवार भाजपाबरोबरच असतील, हे आताच सांगणे कठीण आहे. या निकालानंतर कोण कोणाच्या बरोबर असेल हे सांगताच येत नाही. आता काही लोक सांगत आहेत की, एकनाथ शिंदे आणि शरद पवार यांचे काही तरी चालले आहे. अशी वेगवेगळी चर्चा महाराष्ट्रात सुरू आहे. पाच वर्षापूर्वी कोण कुठे होता? लोकांना कसे कसे पकडून आणले? हे सर्व माझ्या डोळ्यासमोर घडलेले आहे.

### म्हणून मी अजित पवारांबरोबर

महाविकास आघाडीमध्ये असतो तर मला अणुशक्ती नगरमधून तिकीट मिळाले नसते, असेही नवाब मलिक यांनी मुलाखतीत सांगितले. मला अटक झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारने माझा राजीनामा घेतला नाही, हे जरी खरे असले तरी त्यानंतर अजित पवार यांनी वैयक्तिक पातळीवर मला मदत केली. त्यामुळे मी आज त्यांच्या पाठीशी उभा आहे. जर मी मविआमध्ये थांबलो असतो तर मला तिकीटही मिळू शकले नसते. मी राजकारणात नवखा नाही, त्यामुळे काय होऊ शकते, याची मला कल्पना आहे. मला तिकीट दिल्यानंतर टीका होईल, याची पूर्ण कल्पना असूनही त्यांनी मला उमेदवारी दिली.

# श्रीनगरच्या मार्केटमध्ये ग्रेनेड हल्ला!

## हल्ल्यात आतापर्यंत 10 जण जखमी झाल्याची माहिती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरच्या श्रीनगरमध्ये लाल चौकात हँड ग्रेनेड हल्ला झाला आहे. या हल्ल्यात आतापर्यंत १० जण जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींचा आकडा वाढण्याची भीतीदेखील वर्तवली जात आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.श्रीनगरच्या लाल चौकात ग्रेनेड हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांकडून हँड ग्रेनेडद्वारे हल्ला करण्यात आला आहे.**




या हल्ल्यामुळे मोठा स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १० स्थानिक नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे. लाल चौक हा परिसर खरंतर प्रचंड रहदारीचा परिसर आहे. या परिसरात अचानक ग्रेनेडचा हल्ला झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. लाल चौकात दर रविवारी संडे मार्केट असते. प्रचंड गर्दीने मार्केट भरलेले असताना दहशतवाद्यांकडून या ठिकाणी हँड ग्रेनेड हल्ला करण्यात आला आहे. पोलीस तातडीने घटनास्थळी कामाला लागले आहेत. पोलिसांकडून तपास सुरु झाला आहे. दरम्यान, या हल्ल्यात आतापर्यंत 6 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जम्मू-काश्मीरच्या पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा एक मिस्टीरियस ब्लास्ट होता. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. संबंधित घटना ही दहशतवादी असल्याचा दावा केला जातो. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोट झालेल्या परिसराला पोलिसांनी चारही बाजूंनी घेरलं आहे आणि संबंधित परिसर सील करण्यात आला आहे. या घटनेची माहिती देताना एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की दहशतवाद्यांनी टीआरसीजवळ तुफान गर्दी असलेल्या बाजारपेठेत ग्रेनेड फेकले. ज्यामुळे गोंधळ झाला. लोक सैरावैरा धावू लागले.

या हल्ल्यात सहापेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. हल्लेखोरांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला होता. मात्र अद्याप हल्लेखोरांपैकी कोणीही पोलिसांच्या अथवा सुरक्षा दलांच्या हाती लागलेला नाही. या हल्ल्याशी संबंधित माहिती गोळा करण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. या घटनेने जम्मू-काश्मीरच्या स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे. राज्यातील अशांतता आणि सततच्या हल्ल्यांमुळे सामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे. दहशतवादी कारवायांमुळे स्थानिक जीवनावर परिणाम होतोच, शिवाय राज्याची शांतता आणि सुरक्षाही धोक्यात येते. नागरिकांनी परिस्थितीच्या तणावापासून दूर राहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन सुरक्षा यंत्रणांनी केले आहे.जम्मू-काश्मीरमधील अखनूर भागात दहशतवाद्यांनी लष्कराच्या वाहनावर केलेल्या हल्ल्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तीन ते चार दहशतवाद्यांनी हा हल्ला केला असून, त्यांनी लष्कराच्या ताफ्यावर मोठ्या प्रमाणावर गोळीबार केला. या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली आणि सध्या संपूर्ण परिसरात शोधमोहीम राबवली जात आहे. हा हल्ला घडला तेव्हा दहशतवादी स्थानिक मंदिराभोवती लपून बसले होते, असे सूत्रांकडून समजले आहे. दहशतवाद्यांनी मंदिरात प्रवेश करून एका मूर्तीची नासधूस केली.

### लष्कराच्या रुग्णवाहिकेवर गोळीबार

मात्र तेथे उपस्थित लोकांना कोणतीही इजा झाली नाही. मंदिरातून पळून जात असताना दहशतवाद्यांनी लष्कराच्या रुग्णवाहिकेवर गोळीबार केला. या घटनेमुळे परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे, आणि संभाव्य धोक्याचा विचार करून लष्कराने त्याच भागात मोठ्या प्रमाणावर तपास आणि शोध कार्य सुरू केले आहे. दहशतवाद्यांनी टीआरसीजवळ तुफान गर्दी असलेल्या बाजारपेठेत ग्रेनेड फेकले. ज्यामुळे गोंधळ झाला.
लोक सैरावैरा धावू लागले. या हल्ल्यात सहापेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. हल्लेखोरांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला होता. मात्र अद्याप हल्लेखोरांपैकी कोणीही पोलिसांच्या अथवा सुरक्षा दलांच्या हाती लागलेला नाही. या हल्ल्याशी संबंधित माहिती गोळा करण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

---

# सत्ताबदल करण्याशिवाय पर्याय नाही!

## सत्तेत होतो तेव्हा शेतीमालाच्या किमती वाढवून दिल्या : शरद पवार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दुष्काळ पडला तेव्हा अमेरिकेकडून गहू मागवावा लागला. आम्ही सत्तेत होतो तेव्हा शेतीमालाच्या किमती वाढून दिल्या. इंदापूर या भागात प्रचंड ऊस आणि केळीचे पीक आहे. हे सरकार शेतकरी विरोधी आहे. उद्याच्या निवडणुकीत सत्ताबदल करण्याशिवाय पर्याय नाही. मी अनेक ठिकाणी जातो, राज्यातील लोकांना बदल हवा आहे, असं सूचक विधान शरद पवार यांनी केलं आहे.**



विधानसभा निवडणुकींच बिगूल वाजलं आहे, हर्षवर्धन पाटील यांनी विधानसभेच्या तोंडावर राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना पक्षाकडून इंदापूरमधून उमेदवारी देण्यात आली. मात्र ऐनवेळी पक्षात प्रवेश केलेल्या हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देण्यात आल्यानं इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी नाराज आहेत, या बंडखोरीचा फटका हा हर्षवर्धन पाटील यांना निवडणुकीत बसण्याची शक्यता असल्यानं आता हर्षवर्धन पाटील यांच्यासाठी खुद्द शरद पवार मैदानात उतरले आहेत. त्यांनी आज राष्ट्रवादी पवार गटाचे नाराज नेते भरत शाह यांची इंदापूरमध्ये येऊन भेट घेतली.

दरम्यान या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. तसंच निवडणुकीच्या निकालाबाबत देखील त्यांनी सूचक वक्तव्य केलं आहे.


लोकसभेला आपण चांगल्या रीतीने काम केलं. महाराष्ट्र एकेकाळी 1 नंबरचे राज्य होते.

### साखरेचे दर कमी होतील

आता 1 नंबरचा महाराष्ट्र 6 व्या नंबरवर गेला आहे. राज्यकर्त्यांकडून राज्याकडे दुर्लक्ष झालं आहे. कापूस, ऊसाबद्दल सरकारचं धोरण शेतकरी विरोधी आहे. देशात महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेशमध्ये तयार होणारी साखर देशाची गरज भागून शिल्लक साखर आपण बाहेर पाठवतो. पण साखर बाहेर पाठवण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत, त्यामुळे साखरेचे दर कमी होतील आणि उसाचे पण दर कमी होतील. केंद्र सरकारकडे आम्ही प्रश्न उपस्थित केला, तेव्हा उत्तर दिलं तुम्ही पिकवणाऱ्याचा विचार करता आम्ही खाणाऱ्यांचा करतो

# कार्तिक आर्यन मिस्ट्री गर्लला करतोय डेट!

बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यनचे नाव कधी सारा अली खान, तर कधी अनन्या पांडे यांसारख्या अभिनेत्रींबरोबर जोडले गेले. पण, दोन-तीन वर्षांपासून तो स्वतःला सिंगल असल्याचे सांगत आहे. मात्र, कार्तिक आर्यनची 'भूल भुलैया ३'मधील सहअभिनेत्री विद्या बालनने त्याच्या प्रेम प्रकरणाची नुकतीच पोलखोल केली आहे. अलीकडेच 'द ग्रेट इंडियन कपिल शो'च्या एपिसोडमध्ये 'भूल भुलैया ३'ची टीम सहभागी झाली होती. त्यामध्ये विद्या बालन, कार्तिक आर्यन व तृप्ती डिमरी हे सहभागी झाले होते. नुकताच कपिल शर्माच्या एपिसोडचा एक प्रोमो दाखवण्यात आला. त्यामध्ये विद्या बालन कार्तिकच्या प्रेमी जीवनाबद्दलचे एक गुपित उघड करताना दिसली. विद्या म्हणाली की, 'भूल भुलैया ३'च्या शूटिंगदरम्यान कार्तिकचे कोणाशी तरी प्रेम प्रकरण सुरू होते.विद्या म्हणाली,"कार्तिक 'भूल भुलैया ३'च्या शूटिंगदरम्यान नेहमीच फोनवर असायचा आणि त्याच्या संवादांमध्ये नेहमीच 'लव्ह यू... मी टू' सुरू असायचे." प्रोमोमध्ये विद्या कार्तिकला त्या मुलीचे नाव विचारते, त्यावर कार्तिक लाजतो.



कार्तिक आर्यनचं नाव सारा अली खान, अनन्या पांडे व जान्हवी कपूर यांच्याशी जोडलं गेलंय. परंतु, कार्तिकनं आजवर आपल्या 'त्या' नात्याबाबत कधीच उघडपणे वक्तव्य केलेलं नाही. मात्र, 'कॉफी विथ करण'च्या एका एपिसोडमध्ये सारा आणि अनन्यानं हसत-हसत सांगितलं होतं की, दोघींनी अशा व्यक्तीला डेट केलं आहे, जो सगळ्यांचाच एक्स आहे.सध्या 'भूल भुलैया ३' आणि 'सिंघम अगेन' चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. 'भूल भुलैया ३'मध्ये कार्तिक आर्यनबरोबर विद्या बालन, तृप्ती डिमरी, माधुरी दीक्षित, संजय मिश्रा व राजपाल यादव हे मुख्य भूमिकांत आहेत. तर, 'सिंघम अगेन'मध्ये अजय देवगण, करीना कपूर, अर्जुन कपूर, अक्षय कुमार, दीपिका पदुकोण, रणवीर सिंग व टायगर श्रॉफ असे तारांकित कलाकार आहेत. सलमान खानचा विशेष कॅमिओदेखील या चित्रपटात आहे.'भूल भुलैया ३' आणि 'सिंघम अगेन' या क्लॅशबद्दल बोलताना कार्तिकनं 'इंडिया टुडे'ला सांगितले, "माझ्या मते, दिवाळीत फक्त दोनच नव्हे, तर आणखी काही चित्रपट प्रदर्शित झाले असते तरी चालले असते. मला असे वाटते की, हा प्रेक्षकांसाठी बोनसच आहे. मला अशी अपेक्षा आहे की, दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करतील."

## सलमान पोहोचला हैदराबादमध्ये

बॉलीवूडचा भाईजान सध्या त्याच्या कामाबरोबर वैयक्तिक आयुष्यामुळे खूप चर्चेत आहे. सलमान खानला सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. असं असलं तरी सलमान कामासंदर्भात दिलेला शब्द पाळताना दिसत आहे. 'बिग बॉस १८'च्या चित्रीकरणानंतर त्याने 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणाला देखील सुरुवात केली आहे. 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणानिमित्ताने सलमान खान नुकताच हैदराबादमध्ये पोहोचला आहे.२०२५ला ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणाऱ्या 'सिकंदर' चित्रपटाचं चित्रीकरण हैदराबादच्या ताज फलकनुमा पॅलेसमध्ये होत आहे. त्यामुळे सलमान खान हैदराबादमध्ये पोहोचला आहे. ताज फलकनुमा पॅलेस हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे. याच ठिकाणी 'सिकंदर' चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या एक दिवसाआधी सलमान खान पोहोचला.

## आरुषीने गुपचूप लग्न उरकलं



'लव्ह आज कल २' फेम अभिनेत्री आरुषी शर्माने गुपचूप लग्न उरकलं आहे. तिच्या लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेत्रीने बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टरशी लग्नगाठ बांधली आहे. तिने अद्याप लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले नाही, पण तिच्या लग्नात हजर असलेल्या मंडळींनी काही फोटो पोस्ट केले आहेत. 'काला पानी' या वेब सीरिजमध्ये शेवटची दिसलेली आरुषी शर्माने आयुष्यभरासाठी तिचा जोडीदार निवडला आहे. अभिनेत्रीने १८ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये लग्नगाढ बांधली. तिने प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर वैभव विशांतशी गुपचूप लग्न केलं. आरुषी आणि वैभवने अत्यंत खासगी सोहळ्यात सात फेरे घेतले. या लग्नाला फक्त त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते.आरुषी शर्माच्या लग्नाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. ती पेस्टल रंगाचा लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. वैभवनेही खूप सुंदर अशी नक्षीदार शेरवानी घातली आहे.आत्तापर्यंत त्याने 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'पीके', 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' आणि 'बदलापूर' सारख्या जवळपास ५० चित्रपटांसाठी कास्टिंगचं काम केलं आहे. विशेष म्हणजे वैभवने 'काला पानी' या वेब सीरिजसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिलं होतं.

## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे.

## ऐश्वर्याने नाकारलेला ब्रॅड पिटबरोबरचा चित्रपट



ऐश्वर्या रायला जवळपास दोन दशकांपूर्वी अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या ऑफर आल्या होत्या. कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'देवदास' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर हॉलीवूडमध्येही ऐश्वर्याची चर्चा होती. याच काळात तिला ब्रॅड पिटच्या 'ट्रॉय' चित्रपटातील महत्त्वपूर्ण भूमिकेची ऑफर देण्यात आली होती. मात्र, तरीही तिने तो सिनेमा करण्यास नकार दिला होता. ऐश्वर्या रायला ब्रॅड पिटच्या ट्रॉय नावाच्या चित्रपटात काम करण्याची ऑफर मिळाली होती, पण त्यासाठी तिला तिथे राहून ६ ते ९ महिने त्या चित्रपटासाठी शूटिंग करावं लागणार होतं. एवढी चांगली ऑफर ऐश्वर्याने नाकारली होती, कारण तिने काही बॉलीवूड चित्रपट स्वीकारले होते. त्यामुळे तिला आपली कमिटमेंट मोडायची नव्हती. हा चित्रपट नाकारला असला तरी नंतर ऐश्वर्या राय 'ब्राइड अँड प्रिज्युडिस' आणि 'पिंक पार्टनर 2' सारख्या हॉलीवूड चित्रपटांमध्ये दिसली होती.'स्क्रीन'शी बोलताना ऐश्वर्याने या ऑफरबद्दल सांगितलं होतं. ती म्हणाली होती की निर्मात्यांनी तिला या चित्रपटासाठी ६ ते ९ महिने द्यावे लागतील असं म्हटलं होतं. मात्र, त्या तुलनेत तिची भूमिका महत्त्वाची असली तरी इतका वेळ देण्याइतकी मोठी नव्हती. हॉलीवूडचं काम कसं असतं हे त्यावेळी माहीत नव्हतं, असंही तिने सांगितलं होतं. "मी ६ ते ९ महिने त्यांच्या चित्रपटासाठी द्यावे, अशी त्यांची इच्छा होती कारण हा एक मोठा चित्रपट होता," असं ती म्हणाली होती."ऑफर आल्यावर तुम्ही साहजिकच सगळा विचार करता. तुमची भूमिका काय, तुम्हाला त्यासाठी किती दिवस द्यायचे आहेत या सगळ्या गोष्टी. सिनेमा मोठा होता तरी मी ज्या लहान चित्रपटांसाठी होकार दिले होते.

# तुम्ही फलंदाजांना दोष देऊ नका!

## मालिका गमावल्यानंतर रोहित-गौतमवर कुंबळे संतापला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाला न्यूझीलंडविरुद्धच्या ३ कसोटी सामन्यांच्या मालिकेत लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. रोहित शर्माच्या संघाचा ०-३ फरकाने मालिका गमावली. त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. फिरकीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर भारतीय फलंदाजांचा दाणादाण उडाली. यावरुन माजी क्रिकेटर अनिल कुंबळे कर्णधार रोहित शर्मा आणि कोच गौतम गंभीरवर संतापले आहेत.**





भारताला २००० नंतर प्रथमच मायदेशात व्हाईट वॉशला सामोरे जावे लागले. याशिवाय पहिल्यांदाच तीन किंवा अधिक कसोटी सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाने घरच्या मैदानावरील सर्व सामने गमावले आहेत. तिन्ही कसोटीत भारताला धावा करण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यामुळे विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या वरिष्ठ खेळाडूंची खराब कामगिरी आणि फॉर्म हा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. अशात अनिल कुंबळे म्हणाले की लोकांनी फलंदाजांना दोष देऊ नये.या मानहानीकारक पराभवावर बोलताना अनिल कुंबळे यांनी कर्णधार रोहित शर्मा आणि भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर टीका केली. भारतीय फलंदाज फॉर्मात नसताना संघ व्यवस्थापनाने फिरकी गोलंदाजांसाठी अतिशय योग्य असलेली 'रँक टर्नर' खेळपट्टी का निवडली, असा सवाल माजी कर्णधाराने केला. ते म्हणाले, "फलंदाजांना दोष देऊ नका. तुम्ही रँक टर्नर खेळता आणि त्यांच्याकडून चौथ्या डावात १५० धावा करण्याची अपेक्षा करता. कर्णधार आणि प्रशिक्षकाला विचारले पाहिजे की तुमचे फलंदाज फॉर्मात नाहीत हे माहीत असताना त्यांनी रँक टर्नर पिच का निवडली?"या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने पहिल्या डावात २३५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव २६३ धावांवर संपला. ज्यामुळे भारताकडे २८ धावांची आघाडी होती. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा दुसरा डाव १७४ धावांवर संपला आणि त्यांनी एकूण १४६ धावांची आघाडी घेतली. त्यानंतर भारतासमोर १४७ धावांचे लक्ष्य होते, मात्र भारतीय संघ १२१ धावांवरच मर्यादित राहिला. भारताकडून ऋषभ पंतने दुसऱ्या डावात सर्वाधिक ६४ धावा केल्या, तर न्यूझीलंडकडून एजाज पटेलने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या.भारताला २००० नंतर प्रथमच मायदेशात व्हाईट वॉशला सामोरे जावे लागले. याशिवाय पहिल्यांदाच तीन किंवा अधिक कसोटी सामन्यांच्या मालिकेत टीम इंडियाने घरच्या मैदानावरील सर्व सामने गमावले आहेत. तिन्ही कसोटीत भारताला धावा करण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्यामुळे विराट कोहली आणि रोहित शर्मासारख्या वरिष्ठ खेळाडूंची खराब कामगिरी आणि फॉर्म हा महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. अशात अनिल कुंबळे म्हणाले की लोकांनी फलंदाजांना दोष देऊ नये.

या मानहानीकारक पराभवावर बोलताना अनिल कुंबळे यांनी कर्णधार रोहित शर्मा आणि भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर टीका केली. भारतीय फलंदाज फॉर्मात नसताना संघ व्यवस्थापनाने फिरकी गोलंदाजांसाठी अतिशय योग्य असलेली 'रँक टर्नर' खेळपट्टी का निवडली, असा सवाल माजी कर्णधाराने केला. ते म्हणाले, "फलंदाजांना दोष देऊ नका. तुम्ही रँक टर्नर खेळता आणि त्यांच्याकडून चौथ्या डावात १५० धावा करण्याची अपेक्षा करता. कर्णधार आणि प्रशिक्षकाला विचारले पाहिजे की तुमचे फलंदाज फॉर्मात नाहीत हे माहीत असताना त्यांनी रँक टर्नर पिच का निवडली?"या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने पहिल्या डावात २३५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव २६३ धावांवर संपला. ज्यामुळे भारताकडे २८ धावांची आघाडी होती. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा दुसरा डाव १७४ धावांवर संपला आणि त्यांनी एकूण १४६ धावांची आघाडी घेतली. त्यानंतर भारतासमोर १४७ धावांचे लक्ष्य होते.

### भारत दुसऱ्या स्थानावर घसरला

मात्र भारतीय संघ १२१ धावांवरच मर्यादित राहिला. भारताकडून ऋषभ पंतने दुसऱ्या डावात सर्वाधिक ६४ धावा केल्या, तर न्यूझीलंडकडून एजाज पटेलने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या. भारतीय क्रिकेट संघाला न्यूझीलंडविरुद्धच्या ३ कसोटी सामन्यांच्या मालिकेत लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. रोहित शर्माच्या संघाचा ०-३ फरकाने मालिका गमावली. त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर घसरला आहे.

# 'भारतासाठी 'ती' गोष्ट शत्रू ठरतेय...'

## कसोटीत व्हाइट वॉश झाल्यानंतर हरभजनचे मोठे वक्तव्य

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाला मुंबईत न्यूझीलंडविरुद्ध २५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवासह भारताला मालिकेत ०-३ असा पराभव स्वीकारावा लागला. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात तीन किंवा त्याहून अधिक सामन्यांच्या कसोटी मालिकेत टीम इंडियाने घरच्या मैदानात क्लीन उडवण्याची ही पहिलीच वेळ आहे. या पराभवानंतर माजी फिरकीपटू हरभजन सिंग संतापलेला दिसत होता.**




यावेळी त्याने खेळपट्टीवर प्रश्न उपस्थित केले.भारताच्या पराभवानंतर एक्स पोस्ट करताना हरभजन सिंगने लिहिले की, "भारतीय संघासाठी आपल्याच टर्निंग पिच शत्रू ठरत आहेत. संपूर्ण मालिकेत शानदार कामगिरी करत आम्हाला पराभूत केल्याबद्दल न्यूझीलंड संघाचे अभिनंदन. टीम इंडियाला चांगल्या खेळपट्ट्यांवर खेळण्याची गरज आहे, हे मी अनेक वर्षांपासून सांगत आहे. कारण या टर्निंग पिच प्रत्येक फलंदाजासाठी आव्हानात्मक ठरताना दिसत आहेत."एएनआशी बोलताना हरभजन सिंग म्हणाला, "ही परिस्थिती फिरकीसाठी खूप अनुकूल होती. जो खड्डा दुसऱ्यासाठी खणला होता, त्याच खड्ड्यात स्वतःच पडले. हे फक्त आजच झाले असे नाही, तर हे अनेक वर्षांनी घडत आहे. अशा खेळपट्ट्यांवर क्रिकेट सतत खेळले जाते आहे, जिथे सामने तीन-साडेतीन दिवसात संपतात. काही खेळपट्ट्या अशा आहेत, जिथे सामने फक्त दोन दिवसात संपले आहेत. जे या खेळपट्ट्या कसोटी क्रिकेटसाठी योग्य नसल्याचे दर्शवते आणि ज्यात कसोटी क्रिकेटचा आत्मा दिसून येत नाही.

### लाजिरवाण्या विक्रमाची नोंद

मालिकेतील पहिले दोन सामने गमावल्यानंतर तिसऱ्या आणि शेवटच्या कसोटीत रोहित शर्मा आणि भारतीय संघ व्यवस्थापनाने फिरकी ट्रॅकची मागणी केल्याचे वृत्त होते. पहिल्या दिवशी खेळपट्टीवर फारसे वळण नव्हते, पण दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी चेंडू अशा प्रकारे वळला की भारत आपल्याच जाळ्यात अडकला. भारताच्या या पराभवासोबतच कर्णधार रोहित शर्माच्या नावावर एक लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.